CMYK

दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

बीड । गुरूवार
१६.१.२०२५
वर्षे : ४ अंक : २८०
किंमत : ३ रू. पाने : ४

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 पान -१






# वाल्मिक कराडला ७ दिवसांची कोठडी

## बीड कोर्टाबाहेर राडा ; निदर्शने, घोषणाबाजी

बीड, (प्रतिनिधी) :- सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाच्या चौकशीसाठी वाल्मिक कराडच्या पोलीस कोठडीची मागणी एसआयटी पथकाने केली होती. त्यानुसार, बीड सत्र न्यायलायाने मकोका गुन्ह्यातील आरोपी वाल्मिक कराडला ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. त्यानंतर, आरोपी कराडला कोर्टातून पोलीस व्हॅनमध्ये नेत असताना कोर्टाबाहेर चांगलाच राडा पाहायला मिळाला. वाल्मिक कराडच्या समर्थनार्थ अनेकांनी घोषणाबाजी केली, तर काहींनी वाल्मिक कराडला विरोधाही घोषणाबाजी केली. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाच्या महिला कार्यकर्त्या ॲड. हेमा पिंपळे यांनी घोषणाबाजी करत गृहमंत्र्यांनी बीड जिल्ह्यात यावं, असं म्हटलं. तर, काही वकिलांनीही संविधानाचा दाखला देत वाल्मिक कराडवर चुकीच्या पद्धतीने गुन्हे दाखल करण्यात आल्याचं म्हटलंय. त्यामुळे, बीडच्या कोर्टाबाहेरच राडा पाहायला मिळाला. (पान २ वर )

### वाल्मिक कराडची अटक बेकायदा-ठोंबरे

खुनाच्या प्रकरणातील कुठल्याही आरोपीने वाल्मिक कराडचे नाव घेतले नाही. वाल्मिक कराड विरोधात कुठलाही ठोस पुरावा नाही. त्यामुळे, वाल्मिक कराडवर हत्येचा गुन्हा लागू होऊ शकत नाही. वाल्मिक कराड यांची अटक बेकायदेशीर आहे, असे वाल्मिक कराडचे वकिल सिद्धेश्वर ठोंबरे यांनी न्यायालयात म्हटले.



### तिघांच्या फोनवरील संभाषणाची वेळ मिळती-जुळती

काल न्यायालयाती वाल्मिक कराडच्या मकोका गुह्यासंदर्भात सुनावणी झाली. त्यामध्ये बीडमधील सरपंच संतोष देशमुखची ९ डिसेंबर रोजी हत्या झाली, त्यादिवशी दुपारी ३.२० ते ३.३० दरम्यान १० मिनिटांच्या कालावधीत सुदर्शन घुले, विष्णू चाटे आणि वाल्मिक कराड यांचे फोनवरून एकमेकांशी संभाषण झाल्याची माहिती एसआयटी ने कोर्टात दिली आहे. या तिघांमध्ये त्या दिवशी नेमकं काय बोलणं झालं याचा तपास करायचा आहे. त्यामुळे वाल्मिक कराडच्या १० दिवसांच्या कस्टडीची मागणी एसआयटी तर्फे करण्यात आली होती. संतोष देशमुख यांच्या अपहरणाची वेळ आणि या तिघांच्या फोनवरील संभाषणाची वेळ मिळतीजुळती असल्याचंही एसआयटीने म्हटलं.

### सरकारी वकीलाचे न्यायालयातील म्हणणे

वाल्मिक कराडच्या विदेशातील मालमत्तेबाबत चौकशी सुरू आहे. विष्णू चाटे, सुदर्शन घुले आणि कराड यांमध्ये इंटरलिंक काय आहेत? याचा तपास सुरू आहे. तसेच, फरार आरोपी अजून सापडायचा आहे. फरार कृष्णा आंधळेला लपवण्यात यांचा हात आहे का? याची माहिती घ्यायची आहे. घुले आणि चाटे अनेक दिवस फरार होते, त्यांना कोणी मदत केली? याची माहिती घेणं सुरू आहे. त्यामुळे, आरोपीला १० दिवसांची पोलीस कोठडी द्या, अशी मागणी सरकारी वकिलाने न्यायालयात केली होती.

### वाल्मिक कराडवरील गुन्ह्यांची यादी कोर्टात

विशेष म्हणजे ९ डिसेंबर रोजीच दुपारी ३ ते ३.१५ दरम्यान संतोष देशमुख यांचे अपहरण झालेलं होतं. त्याच वेळेच्या जवळपासच तिघांमध्ये फोन कॉल झाल्याचे रेकॉर्डवरुन दिसत असल्याचे एसआयटीने म्हटलं आहे. तसेच, वाल्मिक कराडवर या आधी दाखल झालेले गुन्ह्यांची यादी कोर्टात सरकारी पक्षाकडून सादर केली. इतर आरोपीविरोधातही दाखल गुन्ह्यांची माहिती दिली. वाल्मिक कराडवर मोक्का कसा लावण्यात आला, याचा संदर्भही देण्यात आला आहे. दरम्यान, वाल्मिकने हत्येच्या दिवशीही संतोष देशमुखांना धमकी दिल्याचा दावा एसआयटीने केला आहे. वाल्मिकच्या पोलीस कोठडीसाठी एसआयटीने ९ ते १० ग्राउंडस न्यायालयात मांडले. कोर्टातला हा संपूर्ण युक्तिवाद इन कॅमेरा झाला आहे.

# धनंजय मुंडे सरकारमधील डाग

## त्यांची गुंडाची टोळी थांबवा, मनोज जरांगेंचा घणाघात

जालना, (प्रतिनिधी):-बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडला अखेर ७ दिवसांची सीआयडी कोठडी सुनावण्यात आली आहे. या घटनेनंतर बीड कोर्टासमोर मोठा गदारोळ पाहायला मिळाला. वाल्मिक कराड आणि संतोष देशमुख यांचे समर्थक आमनेसामने आले. यामुळे बीडमध्ये दिवसेंदिवस कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. त्यातच आता मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आक्रमक इशारा दिला आहे. ''बीड जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहिली पाहिजे. धनंजय मुंडे यांना राज्यात दंगली घडवायच्या आहेत. धनंजय मुंडे पांगरीत त्यासाठीच आले. पाप झाकण्यासाठी गुंडाची टोळी रस्त्यावर उतरायला लागला आहे. ही टोळी रस्त्यावर उतरून जातीय दंगली घडवण्याचा प्रयत्न आहे. मुख्यमंत्री साहेब याला थांबावा. या टोळीमुळे एकाही गरीबाला त्रास होता कामा नये, अन्यथा आम्हीही



सहन करणार नाही'', असा इशारा मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिला. ''न्यायदेवता न्याय करणार आहे. संतोष देशमुखांच्या कुटुंबाची हाय लागली आहे. संतोष देशमुखांची हत्या करणाऱ्या आरोपींवर मोक्का दाखल करा, असे मी आधीच म्हटले होते. ही आमची पहिल्यापासूनची मागणी होती. तसेच प्रचंड मोठा दहशत पसरवणारी, जातीयवाद, जातीय तेढ निर्माण करणारी धनंजय मुंडेंची टोळी आहे. या टोळीचा ▶▶पान २ वर

# राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या मुख्य मुन्नीला बोलायला लावा?

## सुरेश धस यांचं विधान,रोख कुणाकडे?

बीड (प्रतिनिधी) :-बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. या प्रकरणातील आरोपींना पोलिसांकडून अटक करण्यात आलं आहे, तर एक आरोपी अद्यापही फरार आहे. तसेच खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडचा सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सहभाग असल्याचा दावा विरोधकांकडून केला जात आहे. दरम्यान, आता वाल्मिक कराडवरही महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कलमान्वये (मकोका) गुन्हा दाखल करण्यात



आला आहे. वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आल्यानंतर परळीत वाल्मिक कराडवर मकोका गुन्हा लावल्याच्या निषेधार्थ त्यांच्या समर्थकांनी परळी बंदची हाक दिली होती. तसेच काही ठिकाणी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली होती. त्यामुळे परळीत तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. दरम्यान, यावर भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी प्रतिक्रिया देत खोचक टीका केली आहे. 'आरोपीसाठी शहर बंद ठेवायचं, दुकाने बंद करायची, आरडाओरडा करायचा, असा नवीन परळी ▶▶पान २ वर

# बीडमधील तणाव कसा कमी करणार?

## पंकजा मुंडे यांची एका वाक्यात प्रतिक्रिया

मुंबई, (वृत्तसेवा) :- एकीकडे सरपंच संतोष देशमुखांच्या हत्येनंतर संपूर्ण बीड जिल्ह्यासह राज्याचं राजकारण ढवळून निघाल्याचं चित्र आहे. त्याचसोबत वाल्मिक कराडवर मकोका लावल्यानंतर परळी बंदची हाक देण्यात आली, समर्थकांनी आंदोलन उभं केलं. तर त्याच वेळी या जिल्ह्याच्या मंत्री असलेल्या पंकजा मुंडे यांनी मात्र यापासून स्वतःला दूर ठेवल्याचं दिसून येतंय.



जिल्ह्यात काय सुरू आहे ते मला काही माहिती नाही, मी माझ्या रोजच्या कामात व्यस्त आहे. माझ्यासाठी काम महत्त्वाचं आहे असं वक्तव्य त्यांनी केलं. बीडमधील तणाव निवळावा यासाठी आपण गृहमंत्र्यांशी चर्चा करू असंही ▶▶पान २ वर



बीड : मकर संक्रांतीनिमित्त मंगळवारी महिलांनी विठ्ठलाच्या मंदिरांमध्ये एकमेकींना वान देऊन मोठ्या उत्साहात तिळगुळ घ्या, गोड गोड बोला... असे म्हणत ये तुम्ही शुभेच्छा देऊन आनंदात संक्रात साजरी करताना महिला भगिनी छायाचित्र दिसत आहेत. (छायाचित्र :आराध्या नरनाळे)

# बूमवाल्यानो बीड सोडा...

## जर चाटून झाले असेल मड्यावरचे लोणी?

क्रॉसलाईन




माध्यमांची भूमिका काय असते? माहिती देणे, विश्लेषण करणे, दबलेल्या आवाजांना लोकात घेऊन जाणे, आता ते आपलाच आवाज वाढवून इतरांना दाबण्यात टीआर'पिणे' गाभण होत आहेत. असो थेट विषयाला हात घालू संतोष देशमुख हत्या प्रकरणी बीडचे चित्रण रंगवताना हा भाग म्हणजे भूतांचा प्रदेश असल्याचे भय पेरण्यात आले, सरकारच्या आखणीत दोन जाती एकमेकासमोर आणल्या नाहीत का अशी शंका यावी असे सगळे आहे हे. वाल्मिक कराड यांच्यावर मोकोका लावला पाहिजे का नाही हा कायद्याचा विषय आहे आणि तो कायद्यानेच लागला आहे असे धस म्हणतात. मात्र आधी न लावणे आणि नंतर लावणे या काल दरम्यान आंदोलन आणि आंदोलन झाले कि मोकोका मग काहींनी तोफा वाजवणे आणि काहींनी उर बडवणे, सर्वांना वाटते हे निरागस आहे मात्र वास्तविक पाहता हे सरकारने सराईत पणे घडवून आणले नसेल कशावरून? खून राहिला बाजूला आणि दोन जातीत लाऊन सरकारने भलताच ▶▶पान २ वर

### भुकेल्या बूममुळे

१) बीड मधील एका इंजीनियरिंग कॉलेज प्राचार्य विद्यार्थ्याने कॉलेज सोडले
२) आनंदग्राम येथील दवाखाना इमारत दाता परतला
३) लहान लहान मुलात वंजारी-मराठा वाटणी
४) विद्यार्थी व्यापाऱ्यांना मुंबई, पुण्यात बीडकर म्हणून दुस्वास
५) बीडला मुलगी देताना, बीडची मुलगी करताना निरुत्साह वाढला
६) बीडकडे अधिकारी नकारात्मक पाहू लागल्याने उत्साह मंदावला
७) गुन्ह्याकडे जात म्हणून पाहिले गेले
८) बीड मधील महाविद्यालये घाबरली
९) बीड नजीक असलेले टाटा सौर उर्जा प्रकल्प बाहेर जाण्याच्या मार्गावर
१०) साधू संत नेते गड जातीत विभागली गेलीत




# ‘मौसम’ है आशिकाना




भारतीय परंपरेत हवामान, पर्यावरण यांस कायमच महत्त्व आहे. तैतिरीय उपनिषदांतील ‘‘शं नो वरुण:’’ ही सागर ज्ञानास आवाहन करणारी प्रार्थना असो वा ऋग्वेदातील निसर्गतत्त्वांचे उल्लेख असोत किंवा कालिदासाचा ‘‘आषाढस्य प्रथम दिवसे’’ मेघांमार्फत प्रेयसीस संदेश धाडणारा मेघदूत असो अथवा दिल्ली-जयपुरात महाराजा जयसिंहांनी उभारलेले जंतर-मंतर असो. हवामान हे भारतीय संस्कृतीचा गाभा राहिलेले आहे. आसमंतातच परमेश्वरास पाहणाऱ्या या संस्कृतीत पर्जन्य, वरुण, सूर्य यांना साक्षात देवाचा दर्जा मिळाला. असा परमेश्वरी दर्जा मिळाला की पूजा होते, भक्ती होते. पण अभ्यास बाजूला राहतो. त्याचे शास्त्र होत नाही. भारतीयांचे हवामानाविषयी असे झाले. त्याचे शास्त्र होण्यासाठी इंग्रजांची वाट पाहावी लागली. आजही अनेकांस माहीत नसेल; पण ज्या वेळी १८५७ चे बंड तापत होते त्या वेळी बंगालातील काही अभ्यासक इंग्रजांकडे आम्हास वेधशाळा हवी म्हणून हट्ट धरून होते. एका वेळी तात्या टोपे, झाशीची राणी आदी इंग्रजांविरोधात उठावाची तयारी करत होते त्या वेळी त्यांचेच देशबांधव त्याच इंग्रजांकडे हवामानाभ्यासासाठी शास्त्राधारित संस्था स्थापनेचा आग्रह धरत होते. त्यात त्या काळी बंगाल प्रांतास दोन मोठ्या अवर्षण हंगामांस सामोरे जावे लागले. त्यामुळे हवामान अभ्यासाची गरज अधिकच अधोरेखित झाली आणि या मागणीच्या पूर्ततेस गती आली. ही बाब कौतुकास्पद. इंग्रजांविरोधातील उठावाचे वर्ष १८५७. देशात पहिली चार विद्यापीठे स्थापन झाली ते आणि हवामानाभ्यासासाठी संस्थेची मागणी पुढे आली ते सालही तेच. यातूनच पुढे हवामान अभ्यासासाठी संस्था उभारण्यास गती आली आणि १८७५ साली १५ जानेवारीच्या दिवशी पहिल्या वेधशाळेची स्थापना झाली. पहिल्यांदा कोलकाता येथे उभी राहिलेली पहिली वेधशाळा पुढे सिमला येथे हलवली गेली आणि नंतर तिचीच शाखा पुणे येथे आकारास आली. पुणे येथील वेधशाळेच्या कार्यालयास ‘सिमला ऑफिस’ असे नाव मिळाले ते यामुळे. या वेधशाळेचा आज १५१ वा वर्धापन दिन. या संस्था निर्मितीसाठी इंग्रजांचे आभार मानता मानता या शास्त्रासमोरील आव्हानांचा परामर्षही यानिमित्ताने घेणे हे कर्तव्य ठरते. अगदी अलीकडेपर्यंत ही वेधशाळा आणि तिचा अंदाज मराठी वाङ्मयातील काही ‘पीजे’ (पांचट जोक्स) निर्मितीचे अथवा व्यंगचित्रकारांचे ‘प्रेरणा’स्थान भले राहिला असेल. ‘‘हवामान खाते मुसळधार पाऊस सांगते आहे म्हणजे छत्री घरी ठेवलेली बरी’’ अशा प्रकारचा उपहास या खात्याने सहन केला असेल. पण गेल्या काही वर्षांत या खात्याची प्रगती लक्षणीय नाही, असे त्या खात्याच्या टीकाकारांसही म्हणता येणार नाही. एके काळी हवामानाचे भाकीत फक्त एक दिवस आधी करण्याची क्षमता असलेली वेधशाळा आता आगामी पाच-पाच दिवसांचा अंदाज अचूक वर्तवते. वास्तविक आपल्यासारख्या प्रचंड, खंडप्राय देशात हवामान अंदाज वर्तवणे कर्मकठीण. मुसळधार पाऊस एकीकडे, दुसरीकडे कडाक्याचे ऊन, तिसरीकडे हिमवर्षाव आणि त्याच वेळी अन्य कोठे पावसाची ओढ असे सारे एकाच वेळी आपल्याकडे असू शकते. त्यात देश अजूनही कृषिप्रधान. त्यामुळे या खात्याचे महत्त्व अधिक. आजही देशाच्या अर्थव्यवस्थेचा तराजू पावसाच्या कमीजास्त बरसातीवर वरखाली होत असतो. फाल्गुनातील हुताशनी पौर्णिमेनंतर अंगाची लाही लाही करणारा सूर्य आकाशातून आग ओकू लागला की सगळ्यांना प्रतीक्षा असते पावसाच्या पहिल्या अंदाजाची. खरे तर प्रत्यक्ष पाऊस सुरू होण्यास महिना-दोन महिने असतात. पण तरीही ‘‘यंदा पावसाळा समाधानकारक’’ या एका वाक्याने अनेकांचा जीव भांड्यात पडतो. नंतर तो पुन्हा अडकतो ‘‘पाऊस अंदमानात/ केरळात अडकला’’ या वाक्याने. आज एकविसाव्या शतकात आधुनिक वगैरे झालेला दोन खोल्यांच्या घरात चार एअर कंडिशनर लावणारा समाज दिलासा शोधतो तो हवामानाच्या अंदाजात. त्यामुळे या खात्यास पहिल्यापासून महत्त्व मिळत गेले. देशातील पहिल्या संगणक-लाभार्थी संस्थांत म्हणून हवामान खाते होते आणि केवळ हवामान अंदाजासाठी अवकाशात उपग्रह पाठवण्याचे भाग्य लाभलेले खातेही तेच होते. तथापि या खात्यास चेहरा मिळाला तो राजीव गांधी यांच्या काळात. त्यांनी डॉ. वसंत गोवारीकर यांच्यासारख्या विशुद्ध विज्ञानप्रेमीकडे ही संस्था सोपवली आणि हवामान खात्याचा प्रतिमाउत्कर्ष सुरू झाला. पुढे वेधशाळेने हवामान अंदाजाची अनेक नवी प्रारूपे बनवली आणि ती यशस्वीही झाली. त्याआधी १९७१ साली ‘भोला’ चक्रीवादळाने बांगलादेशात तीन लाखांचे प्राण गेले, त्याच वर्षी आंध्र आणि ओरिसात चक्रीवादळात जवळपास २० हजार मारले गेले. पण नंतर हवामान खात्याने विकसित केलेल्या चक्रीवादळ अभ्यास केंद्राने या वादळांचा इतका अचूक माग ठेवला की अलीकडच्या चक्रीवादळांची पूर्वसूचना मिळाल्याने सर्वांस सुरक्षित स्थळी हलवता आले. त्या खात्याची हेटाळणी कमी झाली ती तेव्हापासून. नंतर देशभरात अनेक ठिकाणी हवामान केंद्रे वाढत गेली आणि नवनव्या रडारमार्फत बदलत्या हवामानाचा वेध घेता येऊ लागला. आपण उष्णकटिबंधीय. युरोपप्रमाणे आपले ऋतू उच्छृंखल नाहीत. निदान नव्हते. म्हणजे एकाच दिवसात थोडथोड्या अंतराने पाऊस आणि ऊन आपल्याकडे बारा महिने नसते. म्हणून तर ‘ऊन-पाऊस नागडा’ ठरवण्यापर्यंत आपली मजल गेली. आतापर्यंत चार-चार महिने उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा आपापला संसार थाटत आणि मुदत संपली की काढता पाय घेत. ‘नेमेचि येतो मग पावसाळा’ असे म्हणत ‘हे सृष्टिचे कौतुक जाण बाळा’ असे सांगण्याची सोय तेव्हा होती. पण परिस्थितीनुसार बदलणाऱ्या माणसांप्रमाणे हवामानही बदलू लागले आणि नक्षत्रांचे देणे झुगारून कसेही वागू लागले. एरवी ७ जून रोजी शंभर टक्के येणार म्हणजे येणार याची खात्री असलेला पाऊस ताळतंत्र सोडून वागू लागला आणि मग शिशिरातील मार्गशीर्ष पौर्णिमेसही घाम पुसण्याची वेळ आपल्यावर आली. म्हणजे एके काळी १ तारखेस हाती पगार पडणाऱ्या सरकारी नोकरासारखे इमानदार वागणारे हवामान बेरोजगार होऊन रोजंदारीवर गेले. येथून पुढे हवामान खात्याची परिस्थिती हळूहळू हलाखीची बनली. इतके दिवस पृथ्वीभोवती दुलईसारखा असणारा ओझोनचा तळ पातळ झाला आणि सूर्याची तप्त किरणे कोणताही आडपडदा न ठेवता जमिनीवर येऊ लागली. सौरकुलाच्या अधिपतीचाच पाय घसरला म्हटल्यावर इतरांनी स्थानभ्रष्ट होणे ओघाने आलेच. सध्या आपण ही अवस्था अनुभवत आहोत. पाऊस पावसाळ्याच्या आधी तरी येतो किंवा आला तरी सरळ पडत नाही, पडला तर थांबता थांबत नाही. मग बेभरवशी पावसाने तयार झालेल्या शेवाळ्यावर हिवाळ्याचा पाय घसरतो आणि पुढे उन्हाळाही लडखडतो. हवामानाची ही अशी थेरे १५१ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या वेधशाळेसमोर आव्हान निर्माण करणारी आहेत. आज सर्वात मोठे आव्हान आहे ते हवामान बदल हेच. त्यामुळे या बदलत्या हवामानाचा माग ठेवणे ही हवामान खात्याची डोकेदुखी असेल. अनेक विकसित देशांनी या खात्यांसाठी लक्षणीय तरतूद केलेली आहे. आपल्याकडेही ‘स्कायमेट’च्या रूपाने खासगी क्षेत्रसुद्धा हवामान अंदाज क्षेत्रात पाय पसरू लागले आहे. त्या पार्श्वभूमीवर सरकार या खात्यासाठी करत असलेले उपाय आणि तरतूद पुरेशी आहे का हा प्रश्न. अलीकडेच केंद्र सरकारने या खात्यासाठी जेमतेम दोन हजार कोटींची तरतूद केली आणि हे खाते १५१ व्या वर्षात पदार्पण करत असताना केंद्राने ‘मिशन मौसम’ योजना जाहीर केली. हा शतकोत्तरी सुवर्ण महोत्सव समाप्त होत असतानाही काही विशेष घोषणा होतील. ते सर्व आवश्यक. कारण आपणा सर्वांचे भले ‘मौसम है आशिकाना’ असे वाटू लागण्यात आहे. या अत्यंत महत्त्वाच्या संस्थेस आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा.

## बीडच्या शेतकऱ्याचा काकडी लागवडीचा यशस्वी प्रगोय


# एक एकरमध्ये कमावला तब्बल ३ लाखांचा नफा



बीड, (प्रतिनिधी) :- सध्याच्या घडीला शेतकरी शेतीमध्ये नव नवीन प्रयोग करत आहेत. बीड येथील दयानंद पवार यांनी आपल्या एका एकर क्षेत्रामध्ये काकडीची लागवड करून त्यांनी शेतीतून चांगले उत्पन्न मिळवण्याचा आदर्श घालून दिला आहे. मागील चार वर्षांपासून त्यांनी आपल्या शेतामध्ये काकडी उत्पादनाचा प्रयोग सुरू केला आणि तो यशस्वी ठरला आहे. दयानंद पवार यांनी २०१९ मध्ये फक्त १० गुंठे क्षेत्रामध्ये काकडी लागवड केली. हा त्यांचा पहिलाच प्रयोग होता परंतु त्यात त्यांना चांगले यश मिळाले. काकडीच्या शेतीतून त्यांनी अपेक्षेपेक्षा जास्त नफा मिळवला. या यशाने प्रेरित होऊन त्यांनी पुढच्या वर्षी लागवडीचा विस्तार केला आणि एकूण एक एकर क्षेत्रामध्ये काकडीची लागवड सुरू केली. दयानंद पवार आपल्या शेतामध्ये नेत्रा हे काकडी वाण वापरतात. या वाणाला चांगली बाजारपेठ तसेच त्याचा दर्जाही उच्च दर्जाचा असल्यामुळे त्याला ग्राहकांकडून नेहमी मागणी असते. नेत्रा वाणाची काकडी दिसायला आकर्षक असून चवीलाही उत्कृष्ट असते ज्यामुळे बाजारात ती सहज विकली जाते. दयानंद वर्षातून दोनदा काकडीची लागवड करतात. काकडीचे उत्पादन हंगामी असल्यामुळे ती बाजारात वेगाने विकली जाते आणि यामुळे अल्पावधीत त्यांना आर्थिक लाभ मिळतो. योग्य पाणी व्यवस्थापन, खतांचा समतोल वापर आणि आधुनिक शेती पद्धतींचा अवलंब यामुळे दयानंद यांना कमी खर्चात जास्त उत्पन्न मिळवता आले आहे. दयानंद पवार यांना काकडी उत्पादनातून दरवर्षी सुमारे ३ लाख रुपयांचा नफा मिळतो. उत्पादनाचे नियोजन बाजारपेठेची मागणी लक्षात घेऊन विक्री आणि योग्य कष्ट यामुळे त्यांनी आर्थिक स्थैर्य प्राप्त केले आहे. या उत्पन्नाने त्यांनी आपल्या कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावला असून शेतीमध्ये आधुनिक उपकरणांचा वापर सुरू केला आहे. दयानंद पवार यांची ही कहाणी इतर तरुण शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी आधुनिक शेती पद्धतींचा अवलंब करून कमी क्षेत्रातूनही चांगले उत्पन्न मिळवता येते हे दाखवून दिले आहे. पारंपरिक पद्धतींऐवजी नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेतकऱ्यांना आर्थिक प्रगतीचा मार्ग सापडू शकतो हे त्यांनी सिद्ध केले आहे.

# गोपीनाथ मुंडेंनी १९९९ मध्ये आणला मकोका,

## परळीच्या वाल्मिक कराडलाच बसला ‘दे धक्का’



मुंबई, (वृत्तसेवा):- बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या अपहरण आणि हत्या प्रकरणात सूत्रधार असल्याचा ठपका असलेला आणि बीड जिल्ह्यातील खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडवर मकोका लावण्यात आला असून त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडीही सुनावण्यात आली आहे. या प्रकरणावरून बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी चव्हाट्यावर आली. त्याचबरोबर या प्रकरणात मोठ्या प्रमाणावर आरोप प्रत्यारोप करण्यात आले. त्यानंतर आता आणखी एका गोष्टीची चांगलीच चर्चा रंगली आहे, ती म्हणजे ज्या गोपीनाथ मुंडे यांच्यात घरकाम करत वाल्मिक कराडने आपल्या कारकिर्दीला सुरूवात केली. त्याच मुडेंनी अंमलबजावणी केलेल्या कायद्यामध्ये त्यांच्याच जवळचा आणि धनंजय मुंडे यांची सावली असलेला माणूस अडकला आहे. बीड आणि तिथलं राजकारण ज्यांच्या नावाशिवाय सुरू होत नाही. अशा भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांनी कधीकाळी याच गोपीनाथ मुंडेंनी राज्यात वाढत्या गुन्हेगारी विरोधात आवाज उठवला. त्याच गोपीनाथ मुंडेंच्या बीडमधील गुन्हेगारीने बीडची तुलना बिहारसोबत होऊ लागली. गोपीनाथ मुंडे गृहमंत्री असताना त्यांनी लागू केलेल्या कायद्यामध्ये संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील सर्व आरोपी अडकले आहेत, त्यांच्यासोबतच धनंजय मुंडे यांच्या जवळचा असलेला वाल्मिक कराड देखील अडकला आहे. तो कायदा म्हणजे ‘महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा’ अर्थात मोक्का. १९९२ आणि ९३ साली मुंबईत झालेल्या साखळी बॉम्बस्फोटामुळे राज्यात अनेक ठिकाणी दंगली उसळल्या. त्यानंतर महाराष्ट्रातील राजकारण चांगलंच तापलं होतं. याच काळाच वाढत्या गुन्हेगारीच्या विरोधामध्ये गोपीनाथ मुंडेंनी रान पेटवलं. यानंतर १९९५ साली राज्यामध्ये शिवसेना-भाजप युतीचं सरकार स्थापन झालं होतं. युतीच्या सरकारमध्ये गोपीनाथ मुंडे गृहमंत्रीपदी होते. गृहमंत्री पदावरती वर्णी लागल्यानंतर त्यांनी राज्यातील गुन्हेगारी कमी करण्यासाठी कठोर कायदा करण्यासाठी मोठे प्रयत्न केले. संघटित गुन्हेगारीवर वचक ठेवणारा टाडा हा कायदा सुप्रीम कोर्टाने १९९० साली रद्द केला होता. त्यानंतर पुन्हा एकदा राज्यामध्ये पुन्हा संघटित गुन्हेगारी वाढेल, वेळीच वचक ठेवण्यासाठी मुंडेंनी सुप्रीम कोर्टाने टाडा कायद्यावर आक्षेप घेतले होते. ते वगळून नवीन मोक्का कायदा आणण्यासाठी मुडें यांनी प्रयत्न केले होते. केंद्र सरकारने देखील या कायद्याला मंजुरी दिली आणि त्यानंतर महाराष्ट्रात २४ फेब्रुवारी १९९९ साली महाराष्ट्रात मोक्का कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली होती. १९९९ साली अंमलबजावणी करण्यात आलेल्या मोक्का कायद्यावर सर्वोच्च न्यायालयाने आतापर्यंत कोणताही आक्षेप घेतलेले नाहीत. मात्र, हा कायदा महाराष्ट्रात लागू केलेल्या गोपीनाथ मुंडे यांच्या कुटूबातील जवळच्या सदस्याचा निकटवर्तीय वाल्मिक कराडवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे सध्या या चर्चा मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत.

# देशमुखांच्या मारेकऱ्यांना लपविणाऱ्यांचाही हिशोब होईल; आरोपी संख्या पन्नासवर जाईल-खा.बजरंग सोनवणे



बीड, (प्रतिनिधी):-मस्साजोगचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांचा तपास सुरू आहे. दरम्यान, अपहरण करताना स्विफ्ट गाडी कोणाची होती?, मारेकऱ्यांना राहायला कोणी घरं दिली?, या सगळ्या गोष्टी तपासात स्पष्ट होतील. खंडणीमधील जे आरोपी होते ते कोणाच्या घरात होते, त्यांना कोणी गाड्या पुरवल्या हे सगळं समोर येईल आणि त्यांचाही हिशोब होईल. इतकेच नाही तर संघटित गुन्हेगारीच्या या प्रकरणात आरोपींची संख्या पन्नासवर जाईल, अशी प्रतिक्रिया खा.बजरंग सोनवणे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे. खा.बजरंग सोनावणे यांच्यावर संतोष देशमुख यांच्या खुनाशी संबधित असलेला आरोपी वाल्मिक कराड यांच्या पत्नीने वाल्मिक कराड यांना लोकसभा निवडणूकीनंतर जिवे मारण्याची धमकी दिली होती, असा आरोप केल्यानंतर माध्यमांशी बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, उभ्या आयुष्यात मी कधीही कोणाला धमकी दिली नाही. उलट लोकसभा निवडणूकीची मतमोजणी सुरू असताना मलाच दमदाटी केल्याच्या खबरा माध्यमांवर पेरल्या गेल्या. त्यात काही लोकांनी स्वतची वाहवाही करून घेतली. मात्र, निकाल सुरू असताना असे काहीही झाले नव्हते. मी त्यावेळी धमकी दिली तर कराडताईंनी त्याच वेळेस का सांगितले नाही. आता सहा महिन्याने मनघडंत आरोप करण्याचे त्यांचे काम सुरू आहे. त्याबाबत फारसे न बोललेले बरे. दरम्यान, संतोष देशमुख यांचा क्रुरपणे खून करण्यात आला. ही घटना मानवतेला काळीमा फासणारी घटना आहे. या प्रकरणाची व्याप्ती मोठी आहे. संतोष देशमुख यांचे अपहरण करताना स्विफ्ट गाडी कोणाची होती? मारेकऱ्यांना राहायला कोणी घरं दिली?, या सगळ्या गोष्टी तपासात स्पष्ट होतील. खंडणीमधील जे आरोपी होते ते कोणाच्या घरात होते, त्यांना कोणी गाड्या पुरवल्या हे सगळं समोर येईल. परळी बाहेरचा विषय खूप मोठा आहे. केजमध्ये गुंडगिरी आणन्याचा प्रयत्न होत आहे. इतर आरोपींनासुद्धा मकोका लावला पाहिजे ही आमची मागणी आहे. हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टमध्ये अंडर ट्रायल चालवायला हवे. ॲडव्होकेट उज्वल निकम जर होकार देत नसतील तर सतीश मानेशिंदे या वकील महोदयांची नियुक्ती विशेष सरकारी वकील म्हणून करण्यात यावी असेही खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले. * जमावबंदी असताना आंदोलन कसे? : बीडमध्ये दि.१४ रोजी रात्री वाजेपासून जमावबंदी आदेश लागू करण्यात आले होते. असे असतानाही परळीत आंदोलन कसे झाले? हिंदू सणाच्या दिवशी गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी परळी बंद करण्याचा निर्णय घेतला. या प्रकरणी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट घेवून त्यांना सगळा वृत्तांत देणार आहे.

पान १ वरून

### वाल्मिक कराडला...

बीड सत्र न्यायालयाने वाल्किम कराडला ७ दिवसांची एसआयटी कोठडी सुनावली असून २२ जानेवारीपर्यंत पीसीआर देण्यात आली आहे. न्यायालयातील सुनावणीनंतर एसआयटी पथकाने वाल्मिक कराडला न्यायालयातून बाहेर आणल्यानंतर कोर्टाबाहेर राडा झाल्याचं पाहायला मिळालं. कोर्टाबाहेर वकिलांचेच दोन गट दिसून आले, त्यापैकी एका महिला वकिलाने वाल्मिक कराडवर आरोप करत फाशीची शिक्षा द्या म्हणत घोषणाबाजी केली. तर, एका वकिलाने वाल्मिक कराड यांच्यावर चुकीच्या पद्धतीने गुन्हे दाखल केल्याचं म्हणत त्यांचे समर्थन केले, तसेच आंदोलनाच्या माध्यमातून दबाव टाकला जात असल्याचं म्हटलं. त्यानंतर, पोलीस व इतर सुरक्षा रक्षकांनी संबंधित आंदोलकांना ताब्यात घेतल्याचं पाहायला मिळालं.

### राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या मुख्य...

पॅटर्न आता सुरु झाला आहे. तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या मुख्य मुन्नीला बोलायला लावा’, असंही सुरेश धस यांनी म्हटलं आहे. ‘‘परळी बंद करणं शक्य आहे का? नाविन्यपूर्ण योजना हा परळीचा पॅटर्न महाराष्ट्राने पाहावा. कारण कोणत्याही आरोपीला जर त्याच्यावर करण्यात आलेल्या आरोपांनुसार किंवा गुन्ह्यांत पोलिसांनी ताब्यात घेतलं तर शहरे बंद करायची, दुकाने बंद करायची, आरडाओरडा करायचा, शहर बंद करायचं, असा एक नवीन पॅटर्न कालपासून परळीत झाला. मात्र, अशा प्रकारच्या दबावाला कोण विचारतं? व्यापारी त्यांचंच नुकसान करत आहेत. मकर संक्रातीचा काल बाजार बंद केला होता ना? हा जातीवाद नाही तर हा गुडांडवाद आहे’’, असं सुरेश धस यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे. ‘‘वाल्मिक कराड यांना मानणारे ४ ते ५ टक्के लोकांचा हा गुडांडवाद आहे. त्यामुळे जातीवाद हा शब्द वापरला नाही पाहिजे. आता बीडमध्ये कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक दिलेले आहेत. त्यामुळे बीडच्या कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षकांनी काय-काय कारवाई केली ते आम्ही विचारणार आहोत’’, असंही सुरेश धस यांनी म्हटलं. दरम्यान, वाल्मिक कराडच्या पत्नीने काही सवाल उपस्थित केले होते. तसेच हत्येचा संबंध का जोडत आहात? आमच्या दोन नेत्यांना आणि आमच्या समाजाला संपवायचं आहे का? असे सवाल वाल्मिक कराडच्या पत्नीने केले होते. यासंदर्भात बोलताना सुरेश धस यांनी म्हटलं की, ‘‘मी त्या माउलीच्या विरोधात बोलणार नाही. कारण एखाद्या महिलेबाबतीत बोललं की मुद्दा भरकटला जातो. मात्र, माझी विनंती आहे की, राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या (अजित पवार गट) लोकांना सांगा की राष्ट्रवादीच्या मुख्य मुन्नीला बोलायला लावा. यामध्ये अजून बरंच काही आहे. आता आका सापडला आहे, तर आकाच्या पुढे अजून काही कडी सापडतेय का? ते पाहावं लागेल. आकाच्यावरची माणसेही त्यामध्ये सापडणार आहेत. तसेच या प्रकरणात उज्ज्वल निकम यांची नियुक्ती देखील बाकी आहे’’, असं सुरेश धस यांनी म्हटलं आहे.

### धनंजय मुंडे सरकारमधील...

नायनाट झाला पाहिजे. या टोळीचा नायनाट करणं ही मुख्यमंत्र्यांची जबाबदारी आहे’’, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले. ‘‘आता याचा तपास पोलीस, सीआयडी, एसआयटी असा सर्वांचा एकत्रित होणार आहे. त्यांच्या हाती मोठे पुरावेही लागले आहेत. खून झाल्यावर एकमेकांना फोन केले आहेत. त्यांनी व्हिडीओ कॉलही केले. संतोष भय्या ओरडत होते, वेदना सहन करत होते. पण यांना काहीही दया-माया आली नाही. या आरोपींनी सरकारमधील मंत्र्याला वाचण्यासाठी फोन केले असणार आहेत. यांना साथ देणाऱ्यांनीही फोन केलेले आहेत. हे सर्व चार्जशीटमध्ये यायला हवं. यातील एकही आरोपी सुटता कामा नये. ही मुख्यमंत्र्यांची जबाबदारी आहे’’, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. ‘‘या जबाबदारीने त्यांनी राज्याला लागलेला डाग, परळीला लागलेला डाग, धनंजय मुंडेंच्या गुंडांची टोळी आता त्यांच्या जातीलाही मान खाली घालण्याची वेळ आली आहे. यामुळे धनंजय मुंडेंची टोळी संपली पाहिजे. धनंजय मुंडेंची टोळी आहे. काल धनंजय मुंडे याच्यासाठीच परळीत आले होते. देशमुख कुटुंबाला भेटावं असं त्याला वाटलं नाही. माणुसकी त्यांच्यात जिवंत नाही. हा माणूस फक्त पैसेजात वैगरे काही नको, फक्त पैसे आणि पद पाहिजे. यासाठीच जन्म घेतला. क्रूर आहे हे सर्व’’, असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले.

### बूमवाल्यानो बीड सोडा...

वाद बीडच्या बोकांडी आणून बसवला आहे. वंजारी-मराठा समाजात राम राम बंद पडला सामान्य सोडा डॉक्टर प्राध्यापक पोलिसात देखील जातीचे ग्रुप पडले आहेत. देवेंद्र फडणवीस यांना हेच अपेक्षित होते का कुणी विचारले पाहिजे. सरकारच्या विरोधात सरकारचे आमदार वा रे खेळ. एक बुम भेटत नव्हता आता पाच पन्नास दांडके तोंडासमोर पाहून जिभल्या चाटणाऱ्या सरकारी नेत्यांना बूम वाल्यांनी कोलीत दिले, नेत्यांना वाटले आपण टीव्हीवर दिसतो कुणाला वाटले आपण राज्याचे नेते झालो कुणाला वाटले जिल्ह्याचे, कुणाला वाटले जातीचे, सर्वांनी आपले आपले गोल सेट केले आणि ते मिळवले आहेत त्यात मिडियाचे लोक देखील मागते नाहीत. स्वखर्चाने पंधरा पंधरा दिवस मुंबईचा मिडीया बीडमध्ये ढेरीदाखल आहे. घटनेने जिल्ह्याची अस्मिता जिल्ह्याचा सलोखा कसा जाळून खाक करायचे हे मीडियाकडून समजून घ्यावे. ते बूम आहेत का टेंभे, इकडून झाले कि तिकडून. ह बोला धस असे म्हटले आणि धस साहेब बोला मिटकरी तसे म्हणले, खासदार साहेब वाल्मिक यांच्या पत्नी असे म्हटल्या तुमचे म्हणणे काय, गोली मार भेजे मे, मुन्नी बदनाम हुई, आणि मुन्नीची सुन्निच करतो. एका चैनल वाल्याने बातमी केली मला दोन आहेत आमच्यात दम आहे, अरे थांबा रे थांबा समोर माता माऊल्या बसल्या रे, मतावर विभक्तपणा असू शकतो मात्र बिबत्स पणा नको रे मात्र मीडियाची प्रश्नावली देखील वरून येते स्थानिक पत्रकारांना केवळ विचारायचे तेवढे ठेवतात. काल मिलिंद भागवत यांनी पत्रकारिता सोडली कुणास ठाऊक याच उबग येणाऱ्या उतावीळ सनसनीखोर पद्धतीमुळे. आमच्या जिल्ह्याने उस तोडलाय, गडांच्या सानिध्यात अध्यात्म जपला आहे, कोरडवाहू असलेल्या आमच्या जमिनीवर बूम वाल्यांनी गांजा पिकवू नये. संतोष देशमुख यांच्या हत्येचे मारेकरी यावर बातमी करावी, बूम वाल्यांना वाटते आम्ही जे करतो तो परोपकार आहे, मात्र या परोपकारी पत्रकारितेने जिल्ह्याच्या अस्मितेला रोजगाराला अपकार झालाय, त्यामुळे मुंबईचे टेंडर घेऊन आलेल्या बूम ने आता जिल्हा सोडावा आणि इथल्या माती माणसावर उपकार करावे आणि तो एक विलासी जिल्ह्याची उगळू उगळू सावपणाचा आव आणतोय त्याने करू द्यावे आम्हाला आमची कामे, एकदा सदानंद कोचे आणि बीड वरून आमच्या सारख्या खमक्याला घ्यावे कसे आहे एकतर्फी वार्तात्कार करू नये... तूर्तास... बाकी बीडमध्ये केवळ वाल्या कोळी नाही इथे वाल्मिकी रामायण देखील असते कळावे.

### बीडमधील तणाव...

त्या म्हणाल्या. धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड याला मकोका लावण्यात आला असून त्याला सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यानंतर परळीमध्ये त्याच्या समर्थकांनी आंदोलन सुरू केलं. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येवरून राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. सत्ताधारी आणि विरोधकांनीही धनंजय मुंडे यांच्यावर यावरून निशाणा साधला आहे. त्याचवेळी त्यांच्या बहीण आणि मंत्री पंकजा मुंडे यांनी मात्र या सर्वापासून स्वतःला दूर ठेवल्याचं दिसून येत आहे. बीडमध्ये जे काही सुरू आहे त्याबद्दल मला काहीच माहिती नाही. मी माझ्या रोजच्या नियोजनाप्रमाणे काम करत आहे. त्यामुळे या गोष्टी माझ्यासाठी आता मॅटर करत नाहीत. माझ्यासाठी रोजचं काम महत्त्वाचं आहे अशी पंकजा मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली. बीडमध्ये सध्या जो तणाव निर्माण झाला आहे त्यावर गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांसोबत चर्चा करणार असल्याचं पंकजा मुंडे यांनी यावेळी स्पष्ट केलं.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# भारताची मोठ्या सागरी शक्तीच्या दिशेने वाटचालः प्रधानमंत्री नरेंद्र मोदी



## युद्धनौका, विनाशिका आणि पाणबुडी एकाच वेळी राष्ट्राला समर्पित

**मुंबई । प्रतिनिधी**

निलगिरी युद्धनौका, सूरत विनाशिका आणि वाघशीर पाणबुडीचे लोकार्पण ही नौदलाच्या गौरवशाली परंपरेला भविष्यातील आकांक्षेशी जोडणारी ऐतिहासिक घटना आहे. यामुळे भारताची वाटचाल मोठ्या सागरी शक्तीच्या दिशेने सुरू असून भारताच्या सुरक्षा आणि प्रगतीला मोठे सामर्थ्य प्राप्त झाले असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले. भारतात निर्मित सूरत आणि निलगिरी (युद्धनौका) तसेच वाघशीर (पाणबुडी) या तीन महत्वाच्या नौका मुंबईतील नेव्हल डॉकयार्ड येथे झालेल्या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते राष्ट्राला समर्पित करण्यात आल्या. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, नौसेना प्रमुख दिनेशकुमार त्रिपाठी यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते. प्रधानमंत्री श्री.मोदी म्हणाले की, संपूर्ण विश्व हा परिवार



मानून भारत विकासाच्या भावनेने काम करतोय. तीन आघाडीच्या लढाऊ जहाजांचा नौदलामध्ये सम ावेश एक मजबूत आणि स्वावलंबी संरक्षण दल निर्माण करण्यासाठी भारताची अटल वचनबद्धता अधोरेखित करते. भारतीय समुद्र क्षेत्रात भारत प्रथम प्रतिसादकर्ता म्हणून उदयास आला आहे. नौदलाने अनेकांचे जीव वाचवले आहेत आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मालवाहतूक सुरक्षित केली आहे. यामुळे जगभरातून भारतावर विश्वास वाढला असून आज जागतिक स्तरावर, विशेषत: 'ग्लोबल साउथ'मध्ये भारत एक विश्वासार्ह आणि जबाबदार भागीदार म्हणून ओळखला जातो. तीन युद्धनौकांचे राष्ट्रार्पण सैन्याबरोबरच आर्थिक दृष्टीने सुद्धा महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. जमीन, पाणी, हवा, खोल समुद्र किंवा अनंत अवकाश अशा सर्वच क्षेत्रात भारताने आपले हित जपून तिनही सेनादलांच्या माध्यमातून मागील काही वर्षात आत्मनिर्भर बनण्याची प्रशंसनीय वाटचाल सुरू ठेवली आहे. एकाच वेळी विनाशिका, युद्धनौका आणि पाणबुडी कार्यान्वित होत असल्याने छत्रपती शिवाजी म हाराजांच्या पवित्र भूमीवर भारतीय नौदलाने स्वावलंबी होण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असल्याचे प्रधानमंत्री श्री.मोदी यांनी यावेळी नमूद केले. भारतीय सैनिकांना आता भारतीय युद्ध सामग्री उपलब्ध होत असून १०० हून अधिक देशांना संरक्षण सामग्री निर्यात केली जात आहे. या माध्यमातून 'मेक इन इंडिया' योजनेचा विस्तार होत असून आर्थिक प्रगतीचे दार उघडून भारताच्या तिसऱ्या मोठ्या अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्याच्या प्रक्रियेत मोठा हातभार लागत असल्याचे गौरवोद्गार प्रधानमंत्री श्री.मोदी यांनी काढले.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग म्हणाले की, एकाच वेळी तीन युद्धनौका राष्ट्राला अर्पण होत असल्याने भारतीय समुद्री क्षेत्रात देशाची ताकद आणि महत्व वाढले आहे.

## 'दिलखुलास', 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात लीना बनसोड यांची मुलाखत

**मुंबई । प्रतिनिधी**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड यांच्या विशेष मुलाखतीचे प्रसारण होणार आहे.



'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत सोमवार दि. २०, मंगळवार दि.२१, बुधवार दि. २२ आणि गुरूवार दि. २३ जानेवारी २०२५ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व न्यूज ऑन एआयआर'या मोबाईल ॲपवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे. तर 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार दि. २१ जानेवारी २०२५ रोजी रात्री ८.०० वा. दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार आहे.

## देशमुखांच्या मारेकऱ्यांना लपविणाऱ्यांचाही हिशोब होईल; आरोपी संख्या पन्नासवर जाईल

### खा.बजरंग सोनवणे यांची प्रतिक्रिया

**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांचा तपास सुरू आहे. दरम्यान, अपहरण करताना स्विफ्ट गाडी कोणाची होती?, मारेकऱ्यांना राहायला कोणी घरं दिली?, या सगळ्या गोष्टी तपासात स्पष्ट होतील. खंडणीमधील जे आरोपी होते ते कोणाच्या घरात होते, त्यांना कोणी गाड्या पुरवल्या हे सगळं समोर येईल आणि त्यांचाही हिशोब होईल. इतकेच नाही तर संघटित गुन्हेगारीच्या या प्रकरणात आरोपींची संख्या पन्नासवर जाईल, अशी प्रतिक्रिया खा.बजरंग सोनवणे यांनी माध्यम ांशी बोलताना दिली आहे.

## पशुखाद्याचे भाव वाढले

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

हिरव्या चाऱ्यासह पशुखाद्याचे दर वाढल्याने दूध उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. बीड तालुक्यातील पिंपळनेर, नाथापूर,आडगाव, जवळा, घाटसावळी, ईट, कुक्कडगाव, रंजेगाव, घाटसावळी, ताडसोन्ना आदी गावे कोरडवाहू म्हणून ओळखली जातात. त्यामुळे या परिसरातील शेतकरी पावसाच्या पाण्यावर अवलंबून असतात. येथील दूध उत्पादक शेतकरी आपल्या जनावरांना वर्षभर हिरवा चारा देऊ शकत नाहीत, त्यामुळे येथील शेतकऱ्यांना पशुखाद्यावर विसंबून राहावे लागते. शेतकऱ्यांना इतर बागायत क्षेत्रामध्ये जाऊन ऊसवाढे विकत आणावे लागते. जनावरांसाठी आणलेले ऊसवाढे. सध्या वाढ्याचा शेकडा भाव देखील ३०० ते ४०० रुपयांवर पोहचला आहे, तर पशुखाद्याचे भावही दिवसेंदिवस वाढतच आहेत. दूध उत्पादक शेतकरी अडचणीत - ५० किलोच्या भुश्याच्या एका बॅगेसाठी १५०० रुपये, तर कांडीपेंडच्या बॅगेला १७०० रुपयांचा दर आहे. इतर सर्वच पेंडीचे भाव वाढलेले आहेत. वाढे आणि पशुखाद्याचा विचार केला तर दुग्धव्यवसाय सध्यातरी मोठ्या प्रमाणात तोट्यात असल्याचे पिंपळनेर येथील शेतकरी रूपेश जाधव यांनी सांगितले. सध्या हिरवा चारा आणि पशुखाद्यांचे बाजारभाव वाढल्याने दुध उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.

## आज धरणे आंदोलन

**जालना । प्रतिनिधी**

जालना रेल्वे संघर्ष समिती द्वारे उद्या धरणे आंदोलन जालना-खामगाव जालना -जळगाव या महत्त्वाचे रेल्वेला राज्य शासनाने मंजुरी दिले असून येत्या फेब्रुवारी केंद्रीय बजेटमध्ये निधी उपलब्ध करून देण्यासाठी जालना रेल्वे संघर्ष समिती यांनी १६ जानेवारीला सकाळी (११)अकरा वाजता धरणे आंदोलन आयोजित केली आहे या आंदोलनात राज्यमंत्री माजी राजेश भैय्या टोपे ,माजी आमदार कैलास गोरंट्याल, माजी नगराध्यक्ष भास्कर रावजी आंबेकर साहेब व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत तरी जालन्याचा विकासामध्ये रेल्वे हे महत्त्वाच्या मार्ग असून या दोन्ही रेल्वेला गती मिळून देण्यासाठी सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे संघर्ष समिती जालना.

## मकर संक्रांतीनिमित्त सौ स्मिता भुतपल्ले यांच्याकडे सुवासिनीनी लुटला कुंभार चा अवा

**बीड । प्रतिनिधी**

जानेवारी महिन्यातील पहिलाच महिलांचा व सुवासिनींचा आवडता आणि मोठा सण म्हणजे मकर संक्रात या मकर संक्रातीला महिला दिवसभर उपवास ठेवून आपल्या परिसरातील देव देवतांच्या मंदिरामध्ये जाऊन देवी देवतांना वाण देतात तसेच हळदी कुंकू लावून एकमेकींचे ओटी भरतात व आपल्या धन्यास दीर्घायुष्य लाभावे अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतात एकंदरच मकर संक्रात म्हणजे सुवासिनींचा मोठा सण आहे या सणाच्या निमित्ताने कुंभाराचा आवा लूटणे ही परंपरा आहे. यशवंत नगर बीड येथील सौ. स्मिता भूतपले यांनी मकर



संक्रांतीनिमित्त कुंभाराचा आवा लुटला. सर्वप्रथम कुंभार माम ाकडून आणलेल्या सुगड्याची विधिवत पूजा केली, कुंभार माम ाची भट्टी म्हणजेच आव्याची पूजा करून तसेच यशवंत नगर मधील व परिसरातील सुवासिनींना बोलावून हळदी कुंकू लावून वान म्हणून कुंभार मामाकडून आणलेली सुगडी दिली .या आनंदी कार्यक्रम ाला यशवंत नगर मधील असंख्य महिला या अवा लूटण्याच्या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. जमलेल्या सर्व सुवासिनींना भूतपल्ले परिवारातील सौ स्मिता भूतपल्ले सौ कांता भुतपल्ले सौ माधवी भूतपल्ले यांनी सर्व सुवासिनींचे स्वागत केलेआणि सर्वांनी आवा लूटला.

## सरस्वती महाविद्यालयात विद्यापीठ नाम विस्तार दिन साजरा

**केज । प्रतिनिधी**

उपेक्षित, वंचित, गरीब, मजूर, शेतकरी यांच्या प्रवाहा बाहेरील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची द्वारे मराठवाड्यासारख्या अविकसित भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिलिंद महाविद्यालयाच्या माध्यम ातून खुली केली. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हा नाम विस्तार दलित, उपेक्षित आणि बहुजनांचा विचाराचा विजय असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ.हनुमंत सौदागर यांनी केले. ते सरस्वती महाविद्यालय



केज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ विस्तार दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गौतम पाटील हे होते. अध्यक्ष समारोपप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. पाटील म्हणाले की, विद्यापीठाला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देणे ही फक्त बाबासाहेबांना नव्हे तर विद्यापीठासाठी अत्यंत गौरवाची बाब असल्याचे सांगितले. कार्यक्रमास प्रा डॉ आहेर, प्रा डॉ चाटे, प्रा डॉ शिंदे, प्रा डॉ आरडले, प्रा डॉ वराळे,प्रा डॉ कराळे आदींची होती. सूत्रसंचालन प्रा. डॉ. किरणकुमार धिमधिमे तर आभार प्रा. डॉ. सारिका बुरगे यांनी मानले. यावेळी प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.


## जाहीर प्रगटन

**मा.श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : १४९६/२०२४**

**( मार्फत विधिज्ञः - श्री वाय आर शेळके)**

अर्जदार :- १.बबिता मुरलीधर शेळके, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, रा. बेलगांव, ता. जि. बीड, ह.मु.शांती नगर, मजरेवाडी, उत्तर सोलापुर, ता.जि.सोलपुर, २. गोकुळ मुरलीधर शेळके, वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ३. हनुमंत मुरलीधर शेळके, वय ३४ वर्षे, धंदा - शेती, रा. वरीलप्रमाणे, ४. श्रावण मुरलीधर शेळके, वय २८ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे,

विरुध्द निरंक

**प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी नामे **मुरलीधर भगवान शेळके** हे/या दि. **११/०३/२०२१** रोजी राहते घरी **बेलगांव ता. जि.बीड** येथे मयत असुन अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे. तर अर्जदार क्रं. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस, प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांकः १४/१०/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. पुढील तारीखः-

**आदेशावरून.**

शिक्का

(स्वाक्षरीत) क.लिपीक

(स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा. के सी बागल मॅडम, ८ वे दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : ९५ / २०२५**

**साबेरा बेगम व इतर वि. निरंक**

**( मार्फत ॲड. आर. बी. मस्के बीड)**

ज्याअर्थी मयत नामे अहेमद पाशा मो. फयाजोद्दीन अन्सारी रा. बुंदेलपुरा, बीड, ता.जि. बीड हे दि. १२/११/२०१९ रोजी मौजे बुंदेलपुरा, बीड, ता.जि.बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार- १) साबेरा बेगम अहेमद पाशा अन्सारी २) मुख्तार अन्सारी अहेमद अन्सारी ३) अन्सारी अजीज अहेमद पाशा ४) शेख नसीर अहेमद पाशा अन्सारी ५) अन्सारी शेख मुस्ताक अहेमद पाशा वरिल सर्व रा. पात्रुड, ता. माजलगाव, जि. बीड ह.मु. कटकटपूरा, बीड, ता.जि. बीड. ६) बिलखिस बेगम सिराजोद्दीन अन्सारी रा. घर क्र. १५/२५८. लेंबर कॉलनी, गणेश नगर रोड, शिवाजीनगर, पाण्याच्या टाकीजवळ, नांदेड, ता.जि.नांदेड, ७) मिर्झा नफीस बेगम अथर बेग रा. बालेपीर, आमराई, नदी काढी, बीड, ८) जम्शीद बेगम जावेद खान रा. अजमेर नगर, बालेपीर, बीड, ता.जि. बीड, ९) तान्फीस बेगम मिझा शकील बेग रा. अजमेर नगर, बालेपीर, बीड, ता.जि. बीड

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर यांचे वारसाचे प्रमाणपत्र न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे **अहेमद पाशा मो. फयाजोद्दीन अन्सारी रा. बुंदेलपुरा, बीड, ता.जि. बीड** देण्यात येईल.

आज १५/०१/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : २८/०२/२०२५ **आदेशावरून.**

शिक्का

(स्वाक्षरीत) क.लिपीक

(स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**प्र. ९ वे सह दिवाणी न्यायालय क. स्तर बीड यांच्या न्यायालयात**

**कि. दि. अर्ज ८०/२०२५, संगिताबाई वि. निरंक**

१. संगिताबाई गोरक्षनाथ घाडगे, वय - ५३ वर्षे, धंदा - शेती, रा. केतुरा, ता. जि. बीड, २.गणेश गोरक्षनाथ घाडगे, वय - २६ वर्ष, धंदा शेती, रा. केतुरा, ता. जि. बीड

विरूद्ध निरंक

**मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत **गोरक्षनाथ भगवान घाडगे** यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत **गोरक्षनाथ भगवान घाडगे** यांचा दिनांक २८/०९/२०२४ रोजी केतुरा, ता. जि. बीड येथे मृत्यु झाला असून अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस आहेत.

मयत **गोरक्षनाथ भगवान घाडगे** यांचे निधन झाले. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी सदर वारस प्रम ाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की,जर सदरहु, मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत हे गोरक्षनाथ भगवान घाडगे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १५/०१/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख १८/०२/२०२५ आहे.**

**आदेशावरून.**

शिक्का

(स्वाक्षरीत) क.लिपीक

(स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती पी डी चव्हाण ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ५९/२०२५**

**ॲड. ए. व्ही म्हेत्रे यांच्यामार्फत**

**मुक्ताबाई भ्र. सुधाकर खंदारे व इतर व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- १. मुक्ताबाई भ्र. सुधाकर खंदारे, वय-५८ वर्षे, धंदा - घरकाम रा. बुरुडगल्ली, हिरालाल चौक, बीड ता. जि. बीड, २. गणेश पि. सुधाकर खंदारे, वय - ५६ वर्षे, धंदा - व्यापार रा. सदर, ३. रमेश पि. सुधाकर खंदारे, वय-५२ वर्षे, धंदा - नौकरी रा. वरीलप्रमाणे, ४. नागेश पि. सुधाकर खंदारे, वय-४७ वर्षे, धंदा - व्यापार, रा. वरीलप्रमाणे, ५. सचिन पि. सुधाकर खंदारे, वय - ४४ वर्षे, धंदा-खाजगी नौकरी, ह. मु. मंगलमुर्ती धाम, ओल्ड पेट्रोल पंप, बेलवली, बदलापुर (पुर्व) बदलापुर ठाणे, ६. सुनिता भ्र. विजय कुरवाडे, वय - ५४ वर्षे, धंदा - घरकाम, रा. हनुमान मंदीर, धर्मपेठ, शंकर नगर, नागपुर जि. नागपुर ७. वर्षा भ्र. विश्वास ऐतवाडे, वय-४१ वर्षे, धंदा-घरकाम च. बुरुडगल्ली, हिरालाल चौक, बीड ता. जि. बीड (अर्जदार हे भारतीय आहेत)

**विरुध्द निरंक**

**मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत सुधाकर पि. पांडुरंग खंदारे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी सुधाकर पि. पांडुरंग खंदारे यांचा मृत्यु दिनांक २३/०३/२०२३ रोजी राहते घरी बुरुड गल्ली ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क्र १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र २ ते ५ मयताचे मुले आहेत तर अर्जदार क ६ व ७ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. हे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत सुधाकर पि. पांडुरंग खंदारे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३ माहे जानेवारी २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २४ फेब्रुवारी २०२५.**

**आदेशावरून.**

शिक्का

(स्वाक्षरीत) क.लिपीक

(स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

# स्व.संतोष देशमुखांना न्याय देण्यासाठी लढणा-या योद्ध्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी लिंबागणेश येथे दुग्धाभिषेक



**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांना न्याय मिळावा अमानुष हत्याकांडातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी लोकशाही मार्गाने रस्त्यावरील लढाई लढणाऱ्या मराठा आरक्षण योध्दा मनोजजी जरांगे पाटील आणि सभागृहात लढाई लढणारे आ. सुरेश आण्णा धस, आ.संदिप क्षीरसागर,आ. जितेंद्र आव्हाड आणि जिल्ह्यात सक्रिय असणारे राजेंद्र मस्के यांच्या प्रतिमेची काल दि.१४ मंगळवार रोजी वाल्मिक कराड यांना पोलीस प्रशासनाने मकोका अंतर्गत गुन्हा दाखल केल्यानंतर परळीतील वाल्मिक कराड समर्थकांनी गदारोळ करत सार्वजनिक ठिकाणी मनोजजी जरांगे पाटील, आ.सुरेश आण्णा धस, आ.संदिप क्षीरसागर,आ.जितेंद्र आव्हाड यांच्या प्रतिमेची विटंबना केली होती. वास्तविक पाहता लोकप्रतिनिधींनी स्व.संतोष देशमुख यांना न्याय मिळवण्यासाठी संविधानिक पद्धतीने सभागृहात व रस्त्यावर आवाज उठवला म्हणुन आज दि.१५ बुधवार रोजी सकाळी लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात बालाघाट परीसराच्या वतीने शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांच्या नेतृत्वात विक्की आप्पा वाणी, अशोक वाणी ,विनोद चौरे, गणेश वाणी, उमेश वाणी यांनी मनोज जरांगे पाटील व वरील लोकप्रतिनिधींच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक केला. जिल्हा प्रशासनाने जमावबंदीचे आदेश लागू केले असल्याने कायद्याचे उल्लंघन होऊ नये याची दक्षता घेत केवळ ४ जणांनी यात सहभाग घेतल्याचे बाळासाहेब मोरे पाटील यांनी सांगितले.

## कॉलर का उडवितो म्हणून पिंपरखेडच्या तरुणाची संभाजीनगर मध्ये हत्या

**वडवणी । प्रतिनिधीं**

संभाजीनगर येथे शिक्षणासाठी रहात असलेला १९ वर्षीय प्रदीप विश्वनाथ निपटे या विद्यार्थ्यांची अज्ञातांनी निघृण हत्या केली. मित्र बाहेर गेलेले असताना मारेकऱ्यांनी त्याच्या फ्लॅटवर जाऊन गळा चिरून हत्या केली. मंगळवारी रात्री ११.३० वाजता उस्मानपुऱ्यात ही धक्कादायक घटना उघडकीस आली. पोलीस आरोपींचा शोध घेत असून, कॉलेजमध्ये कॉलर उडविण्याच्या कारणामधून ही



हत्या झाली असावी असा प्राथमिक अंदाज आहे. मूळ पिंपरखेड ता. वडवणी जि. बीड असलेला प्रदीप देवगिरी महाविद्यालयात बीसीएसच्या प्रथम वर्षात शिकत होता. एक मावसभाऊ व अन्य तीन मित्र, असे चौघे भाजीवालीबाई पुतळ्याजवळील एका अपार्टमेंटमध्ये फ्लॅटमध्ये किरायाने राहत होते. मंगळवारी महाविद्यालयातून सर्व जण परतले. सायंकाळी त्याचा भाऊ व अन्य मित्र बाहेर गेले होते. प्रदीप मात्र एकटाच फ्लॅटवर थांबला होता. रात्री १० वाजता ते खोलीवर परतले. तेव्हा प्रदीप गळा कापलेल्या रक्तबंबाळ मृतावस्थेतच दिसला. घटनेची माहिती मिळताच उस्मानपुऱ्याचे पोलीस निरीक्षक अतुल येरमे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली.

## रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्त वाहनांना रिफ्लेक्टर लावण्यात आले

**बीड । प्रतिनिधी**

महामार्ग पोलीस केंद्र गेवराई हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वर गढी शिवारातील जय भवानी साखर कारखाना गढी येथे रस्ता सुरक्षा सप्ताह अभियान अंतर्गत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

वाहतुकीचे नियम सांगून ट्रॅक्टरला व बैलगाडी ला रिफ्लेक्टर लावणे बाबत, जेणे करून रात्रीच्या वेळी बैलाच्या शिंगांना रेडीयम लावण्यात यावे, रस्त्याने चालत असताना सव्हिर्स रोडचा वापर



करावा महामार्ग वर डाव्या बाजुनू ऊसाने भरलेले वाहन चालवावे व ट्रॅक्टर चालक यांनी टेपचा आवाज कमी करावा.जेणे करून पाठीमागील वाहनांचा आवाज तुमच्या पर्यंत येईल वापरणे दारू पिवून वाहन चालू नये.जर उसाची ट्रॉली पलटी झाली तर १०८ महामार्ग पेट्रोलिंग यांना तात्काळ कळवतील.जेणे करून वाहतूक कोंडी होणार नाही.अपघात न होण्यासाठी घ्यावयाची काळजी तसेच अपघातग्रस्तांना मदत करने मदत केल्यास तुम्हाला पोलीसा कडून कोणतीही अडचण येणार नाही तसेच अपघात संबंधाने मा सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशा बाबत चालक व प्रवासी यांना माहिती दिली या वेळी आम्ही सोबत पोह-१६४६ म्हेत्रे,पोना -८९९ गडदे ,चापोह -२०५० जमशेटे हजर होते व कारखान्यावरील ५० ते ६० चालक व ऊस तोड कामगार हजर होते.

## राजेश गदळे यांना मातृतीर्थ प्रतिष्ठानचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**बीड । प्रतिनिधीं**

मातृभूमी प्रतिष्ठान यांच्याद्वारे दरवर्षी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा तसेच विविध क्षेत्रातील व्यक्तींचा राज्यस्तरावर गौरव करण्यात येतो. त्याच अनुषंगाने रविवार दिनांक १२ जानेवारी रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात श्री विठ्ठल गड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी, ता. केज जि. बीड संचलित गुरुनानक प्राथमिक विद्यालय शाहूनगर ,बीड येथील सहशिक्षक श्री राजेशजी गदळे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.यावेळी प्रमुख उपस्थिती महंत ह.भ. प. राधाताई महाराज , ह. भ. प. मोहन महाराज खरमाटे, माजी आमदार उषाताई दराडे यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच शाळेतील विविध उपक्रमाद्वारे नावलौकिक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचाही गुणवंत विद्यार्थी म्हणून सन्मान करण्यात आला यात ओमसाई गायकवाड, गदळे आनुष (विज्ञान प्रदर्शनात जिल्हास्तरावर निवड)शेख राहीन(योगासन जिल्हास्तर)आंधळे सृष्टी (रामानुजन ऑलिम्पियाड गोल्ड मेडल)पवार तनुजा (इंस्पायर अवॉर्ड) यांचा समावेश आहे.



एकाच शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष मा. श्री विक्रम बप्पा मुंडे,अध्यक्ष मा. विजयकांत भैय्या मुंडे,सचिव मा. अतुल दादा मुंडे शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती पवार एस. ए. तसेच संपूर्ण स्टाफ आणि मित्रपरिवार यांनी सरांच्या आणि शाळेच्या शिरपेचात अजून एक मानाचा तुरा खोवल्याबद्दल अभिनंदन केले आहे

## क्रीडा स्पर्धेत विविध खेळात सहभाग नोंदवण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधीं**

युवा सप्ताहात दिन्नांक १४/०१/२०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल हॉल, बीड येथे सकाळी ११.४५ वा. देशभक्तीपर समुहगान स्पर्धा, दि.१५ जानेवारी २०२५ रोजी स्वच्छता दिवस, दि.१६ रोजी सकाळी ११.०० वा.सत्नदिप विद्यालय, उमाकिरण कॉम्पलेक्स, शाहु नगर, बीड येथे निबंध स्पर्धा, दि.१७ रोजी तालुका क्रीडा संकुल मौदान, खंडेश्वरी मंदीर समोर, बीड येथे सकाळी ११.०० वा. सॉफ्टबॉल व बेसबॉल खेळाचे प्रदर्शनीय सामने आयोजित करण्यात आले आहेत, दि.१८ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे सकाळी ११.०० वा. देशामध्ये शांतता राखण्यात युवकांची कर्तव्ये या विषयावर चर्चासत्र, दि.१९ रोजी जिल्हा क्रीडा संकुल हॉल, बीड येथे सकाळी ११.०० वा. चित्रकला स्पर्धाचे आयोजन तर सप्ताहाचा समारोप दि.२१ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. जिल्हा क्रीडा संकुल हॉल, बीड येथे करण्यात येणार आहे. सदर स्पर्धेमध्ये २१ वर्षाखालील युवक व युवतींन सहभाग घेता येईल.

अधिकच्या माहिती करिता कार्यासन अधिकारी रेवनानथ शेलार यांना ९०७५४७६७९१ भ्रमणध्वन्नीवर संपर्क साधावा व जास्तीत जासत युवक युवतींनी युवा सप्ताहानिमीत्त आयोजित विविध स्पर्धा व कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले आहे.

## शहरातील वाढीव घरपट्टी व नळपट्टी बाबत नागरिकांची मुख्याधिकारी यांच्यासोबत बैठक घेऊन पुढील दिशा ठरवणार : मोहनराव जगताप

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव शहरातील नागरिकांना नगरपालिकेने वाढीव घरपट्टी व नळपट्टी बाबत मोठ्या प्रमाणावर मालमत्ता कर आकारणी केली असून अनेक नागरिकांना घरपट्टीच्या पावत्या पाहून धक्का बसला याबाबत अनेक तक्रारी नगरपालिकेत देऊन काहीच उपयोग होत नसल्याने शहरातील नागरिकांनी एकत्र येऊन याबाबत माजी नगरसेवक शरद यादव यांच्या पुढाकारातून शरदचंद्रजी पवार पक्षाचे नेते मोहनराव जगताप यांचे भेट घेऊन शहरातील नागरिकांची बैठक आयोजित केली या बैठकीत नागरिकांनी अनेक तक्रारी चा पाढा मोहनराव जगताप यांच्यासमोर वाचला. अनेक जणांना कनेक्शन



नसताना नळाची बिले कमर्शियल रेसिडेन्शिअल दरामध्ये य मोठी तफावत मालमत्ता करामध्ये आढळून आल्याने नागरिकांनी सर्व तक्रारी मोहनराव जगताप यांना लेखी स्वरूपात दिल्या या सर्व तक्रारीचे दखल घेऊन मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांच्याशी मोबाईलद्वारे संपर्क साधून मोहनराव जगताप यांनी दोन दिवसात नगरपालिकेत नागरिकांसोबत बैठक आयोजित करण्याची सूचना दिल्या सर्व समस्या त्यांच्यासमोर मांडून व नागरिकांच्या समस्यांचे निराकरण न झाल्यास याबाबत पुढील दिशा आपण ठरवू असं बैठकीमध्ये मोहनराव जगताप यांनी नागरिकांना आश्वासित केले. या बैठकीला शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते.

## नामांतराचा लढा समता, स्वातंत्र्य, बंधुभाव पुढे नेणारा होता : अनिल वाघमारे



**वडवणी । प्रतिनिधीं**

येथील लोकमान्य टिळक महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ३१ वा नामविस्तार दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे अध्यक्ष श्री पंजाबराव मस्के तसेच प्राचार्य डॉ. के. एम .पवार, उपप्राचार्य, डॉ. बी. जी कुलकर्णी उपस्थित होते . प्रमुख पाहुणे म्हणून साप्ताहिक डोंगरचा राजाचे संपादक श्री. अनिल वाघमारे हे होते. यावेळी राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

आपल्या प्रास्ताविक भाषणात प्राचार्य डॉ. के. एम. पवार यांनी डॉ. बाबासाहेबांचे नाव विद्यापीठाला देण्यासाठी १७ वर्षे लढा द्यावा लागला. प्राण व वित्तहानी मोठ्या प्रमाणावर झाली. शेवटी १४ जानेवारी १९९४ ला विद्यापीठाची फाळणी झाली. एका विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व दुसऱ्याला स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड असे नाव देण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात विद्यापीठ नामांतराचा लढा हा शोषित वर्गाने आपल्या हक्कासाठी उभारलेले जन आंदोलन होते. नामांतराचा लढा हा केवळ विद्यापीठाची पाटी बदलणारा नव्हता तर तो समता, स्वातंत्र्य, बंधुभाव पुढे नेणारा होता. असे मत श्री. अनिल वाघमारे यांनी व्यक्त केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. पंजाबराव मस्के यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा ही दिलेली शिकवण प्रत्येकाने अंगीकारली पाहिजे, तरच समाजाचा व देशाचा विकास होईल असे मत व्यक्त केले. प्रस्तावना प्रा. भालेराव यांनी केली तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. अशोक खेत्री यांनी केले.

## माहिती व तंत्रज्ञानाचा बदल लक्षात घेता सर्व नागरिकांनी ऑनलाईन अर्ज भरावेत: राज्य सेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव

**बीड । प्रतिनिधीं**

माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात झपाटयाने झालेला बदल पाहता आपल्या कामाचा निपटारा लवकर होण्याच्या दृष्टीने व शासकीय कामात पारदर्शकता यावी यासाठी तंत्रज्ञानाचा अधिक वापर करुन नागरिकांनी ऑनलाईन अर्ज भरावेत, असे वक्तव्य राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात विविध विभागाच्या आढावा बैठकी प्रसंगी केले. यावेळी ते म्हणाले की, आपले सरकार सेवा



केंद्राच्या ठिकाणी नागरिकांना चांगल्या सुविधा मिळण्यासाठी तिथे कोण कोणते कामाचे फॉर्म ऑनलाईन भरल्या जातात त्यासाठी दर्शनी भागात बोर्ड लावून त्यावर सर्व माहिती मराठीत लिहून ठेवावी, तसेच तिथे पिण्यासाठी स्वच्छ पाणी, तक्रार पेटी, विहीरीसाठी अनुदान बाबत माहिती , इतर सुविधा असायला हव्यात, या केंद्रांची संबधित अधिका-यांनी वेळो-वेळी तपासणी करुन त्यांना सूचना द्याव्यात. जिल्हयात ३८ विभाग आहेत ज्या विभागातील अपिलीय अधिका-यांनी ऑनलाईन पध्दतीने चांगली कामे केली आहेत त्या अधिका-यांचा २६ जानेवारी किंवा १५ ऑगस्ट रोजी पालकमंत्र्याच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी संबधित विभागाला दिल्या. आपले सरकार सेवा केंद्रातील अधिकच्या माहितीसाठी शाळा व महाविद्यालयामध्ये कॅम्प घेतले तर विद्यार्थ्यांना पोर्टलची माहिती होईल, आपल्या हक्काची पायमल्ली होऊ नये यासाठी ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी यांनीही स्वत:च्या प्रोफाईलवरुन अर्जाचे अपिल करण्याकडे लक्ष द्यावे.

## राष्ट्रीय युवा दिन्न युवा सप्ताहाचे उद्घाटन संपन्न

**बीड । प्रतिनिधीं**

केंद्र शासन्नाच्या महत्वाकांक्षी योजन्नेव्दारे संपूर्ण भारतामध्ये स्वामी विवेकान्नंद यांची जन्म दिवस दि.१२ जानेरी युवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो व त्या निमित्तान दि.१२ ते १९ जानेवारी हा कालावधीत युवा सप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो. युवकांचा सर्वांगिण विकास करणे, राष्ट्रीय व सामाजिक कार्यात सहभागी होण्यासाठी युवकान्ना उपयुक्त करणे त्या करिता युवकांच्या विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन्न करणे.युवकांमध्ये व्यक्तीमत्व नेतृत्व गुण विकसीत करणे, राष्ट्र उभारणी मध्ये युवकांची महत्वपूर्ण भूमिका असल्याने सामाजिक उपक्रम आयोजन, नियोजनामध्ये युवकांचा सहभाग वाढविणे, युवकांनी केलेल्या कार्याचा यथोचित गौरव करणे, शारिरिक क्षमता व व्यामाची आवड निर्माण करणे. तसेच खेळाकडे आकर्षित करण्यासाठी स्पर्धांचे आयोजन करणे, चर्चासत्र परिसंवाद, युवा मेळावा, राष्ट्रीय एकात्मता उपक्रम माध्यामातून्न युवकांना प्रोत्साहन्न देणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.

# आर्थिक व्यवहार ठप्प चेअरमन महोदय गप्प उसनवारी करून खातेदारांना पैसे देण्याची वेळ!

**गेवराई । प्रतिनिधीं**

बँकिंग क्षेत्रातील आज रोजीची परिस्थिती विविध क्षेत्रांत रोजंदारीवर काम करणाऱ्या विशेषतः सर्वसामान्य कामगारांना बेकारीचे दिवस आणण्यासाठी कारणीभूत ठरत आहे. या काळात अनेक पिग्मी खातेदारांचे व्यवसाय ठप्प झाले आहेत तर दुसरीकडे स्वयंघोषित गावभर फिरणाऱ्या चेअरमनमुळे याचा परिणाम आर्थिक व्यवहारांवर झाला असून, विविध मल्टिस्टेट व सहकारी पतसंस्थांसाठी दैनंदिन ठेव रक्कम गोळा करणाऱ्या पिग्मी प्रतिनिधींना देखील याचा मोठा फटका बसला आहे.

गेवराई शहरात विविध पतसंस्थांसाठी दैनंदिन रक्कम गोळा करणारे प्रतिनिधी मोठ्या प्रमाणात आहेत. कुटुंबासाठी दोन पैसे जादा कमवता यावेत, यासाठी कुणी जोड व्यवसाय म्हणून हे काम करतात तर काही तरुण पूर्णवेळ या कामासाठी वाहून घेणारे आहेत. तसेच काही प्रमाणात महिलाही दररोज मोठी रक्कम गोळा करून त्यातून मिळणाऱ्या कमिशनच्या रकमेतून कुटुंबाला मोठा हातभार लावताना दिसतात. मात्र तेच पिग्मी प्रतिनिधी मोठ्या संकटाला सामोरे जात आहेत पिग्मी प्रतिनिधीच्या हाताला काम राहिलेले नाही. प्रत्येक दुकानासमोर पैसे संचयनासाठी दररोज न चुकता जाणाऱ्या अशा प्रतिनिधींना सध्या आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. तर जे पूर्णवेळ हा व्यवसाय करणारे आहेत, अशांवर उपासमारीची वेळ आली आहे. उसनवारी करून काही पिग्मी प्रतिनिधी एक -एक दिवस ढकलत आहेत.आर्थिक व्यवहार ठप्प चेअरमन महोदय गप्प बसले कि काय अशीच परिस्थिती चालली आहे परंतु हातावर पोट भरत असणाऱ्या पिग्मी प्रतिनिधीचे आर्थिक दृष्ट्या हाल होताना दिसत आहेत सातत्याने न्यायालयीन तारखेसारख्या तारीख पे तारीख हे ऐकून आर्थिक व्यवहार सुरळीत होईल असे अनेक वायदे बाजारात मांडले की काय अशी शंका येते म्हणून खाजगी व्यवहार पूर्ण होण्यासाठी एवढा कालावधी लागतो का? दिवसेंदिवस वाढतच चाललेली बेजारी यातुन सुटका कधी होते. हे प्रकरण लक्षात घेऊन कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे

